IMPACT FACTOR 5.473(SJIF)

UPA NATIONAL E-JOURNAL

Interdisciplinary Peer-Reviewed IndexedJournal

ISSN 2455-4375

# भारतातील पंचायतराज व्यवस्था व महिलांचे नेतृत्व

**प्रा. डॉ. राष्ट्रपाल गणवीर**
महिला महाविद्यालय, नागपूर
मोबाईल नं. ९८२२२०३०४१
Email : rashtrapalganvir@gmail.com

---

*सारांश—*

*भारताच्या लोकशाही राज्य व्यवस्थेत महिलांची भूमिका आणि दर्जा काय आहे व भारताच्या लोकतांत्रिक व्यवस्थेत त्यांचे स्थान कसे आहे या गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे. ज्या शासन पद्धतीत नागरिकांच्या इच्छेला व हिताला महत्व देवून व्यक्तीस्वातंत्र्याचा आणि व्यक्तीविकासाचा विचार करून शासन कारभार चालविला जातो अशा शासन प्रकाराला लोकशाही म्हटले जाते. लोकशाहीची व्याख्या करतांना अब्राहम लिंकनने म्हटले होते की, लोकांचे, लोकांनी व लोकांसाठी चालविलेले शासन म्हणजे लोकशाही होय. तर लॉर्ड ब्राईसने म्हटले आहे की, लोकशाही म्हणजे असा शासन प्रकार आहे की ज्यामध्ये सत्ता एका विशिष्ट वर्गाच्या हाती नसते तर ती संपूर्ण जनतेच्या हाती असते. लोकशाही ही सामाजिक, आर्थिक व नैतिक सुव्यवस्थेचे एक स्वरूप आहे. त्याचबरोबर ती जीवन जगण्याची एक पद्धती सुद्धा आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, परस्पर सद्भाव आणि परमत सहिष्णुता या श्रेष्ठ जीवनमूल्यांवर लोकशाही आधारलेली आहे.*

*स्वातंत्र्यापूर्वीची भारतीय महिलांची स्थिती फारच वाईट होती. चुल आणि मूल एवढेच तिचे कार्यक्षेत्र होते. प्राचीन भारतीय वेद, पुराण, रामायण, महाभारत, मनुस्मृती या धर्मग्रथांमध्ये महिलांसाठी अन्यायकारक कायदे असल्याचे दिसून येते. त्यामुळे त्यांचे जीवन अत्यंत दयनीय होते. अनेक रूढी प्रथांनी त्यांचे जीवन बंदिस्त केले होते. परंतु ब्रिटिशांच्या राजवटीनंतर भारतात इंग्रजी शिक्षणाला सुरवात झाली. त्यानंतर उदारमतवादी विचाराचा प्रसार झाला. उदारमतवादाचे पुरस्कर्ते राजा राममोहन रॉय यांनी सामाजिक सुधारणा करून महिलांना स्वातंत्र्य आणि अधिकार मिळावेत यासाठी प्रयत्न केले. महात्मा ज्योतीबा फुले यांनी रयतेला सर्व प्रकारच्या गुलामगीरीतून मुक्त करणारी समाजरचना म्हणजे शोषण विरहित लोकशाहीचा विचार मांडला. समाजातील सर्व उपेक्षित घटकाला आचार विचाराचे स्वातंत्र्य मिळाले पाहिजे असे त्यांनी विचार मांडले. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी माणसाला माणसासारखी वागणूक देणाऱ्या व स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायावर आधारित लोकशाहीची कल्पना मांडली व संविधानात स्त्री—पुरूषांना समान अधिकारांचा विचार मांडला.*

भारतीय लोकशाहीत महिलांना पुरूषांच्या बरोबरीचे सर्व क्षेत्रात समान अधिकार संविधानाने दिल्यामुळे मगील काही वर्षात महिलांनी चूल आणि मूल या पलीकडे जावून आपली ओळख निर्माण केली. जमीन, जंगल, अवकाश आणि इतरही क्षेत्रात महिलांनी वर्चस्व स्थापित केले. देशातील सर्वोच्च राजकीय पदांपासून ते तांत्रिक, वैद्यकीय, न्याय प्रशासन अशा सर्वच क्षेत्रातील महिलांचे प्रमाण वाढत आहे. महिलांनी संधी मिळताच आपली गुणवत्ता व समर्थता सिद्ध केली. असे असले तरी सुद्धा भारतीय समाज महिलांना आजही समान मानण्यास तयार नाही. अनेक मंदिरांमध्ये महिलांना आजही प्रवेश करू दिला जात नाही. तसे फलक मंदिराच्या प्रवेशद्वारावर मोठया अक्षरात लावलेले दिसून येतात.

एकविसाव्या शतकातही महिलांचा होत असलेला स्वातंत्र्याकडचा प्रवास मनापासून स्वीकारला आल्याचे दिसून येत नाही. राजकीय क्षेत्रात इंदीरा गांधी पंतप्रधान, प्रतिभाताई पाटील राष्ट्रपती, मीरा कुमार, सुषमा स्वराज, मायावती, जयललीता, ममता बॅनर्जी, शीला दिक्षीत, सुप्रिया सुळे, सोनिया गांधी, सुमित्रा महाजन, वसुंधरा सिंधिया, पंकजा मुंढे अशा अनेक महिला आपले वर्चस्व व अस्तित्व टिकवून आहेत. भारतीय संसद, भारतीय प्रशासन व शासन, भारतीय न्याय व्यवस्था, भारतीय मिडिया इत्यादी सर्वच क्षेत्रात महिलांचा नोंद घेण्याएवढा प्रभाव वाढला असून त्याचे प्रमाण वाढत आहे.

असे असले तरी सुद्धा महिलांवर होणारे अन्याय, अत्याचार, त्यांचे शारीरिक व मानसिक शोषण अजूनही थांबलेले दिसत नाही.

कोणत्याही लोकशाही व्यवस्थेची पहिली आधारभूत अवस्था म्हणजे पंचायत ही होय. महात्मा गांधींजी म्हणाले होते की जेथे सर्व नागरिकांना सहभागी होता येते तीच खरी लोकशाही होय. महात्मा गांधींचे स्वप्न साकार करण्यासाठी आणि लोकशाही विकेंद्रीकरण करण्याच्या हेतूने तसेच भारतीय लोकशाहीत लोकांचा सहभाग वाढावा यासाठी पंचायत राज व्यवस्था भारतात स्वीकारण्यात आली. ७३ व्या आणि ७४ व्या संविधान दुरूस्तीनुसार पंचायत राज व्यवस्थेला संवैधानिक दर्जा देण्यात आला. या संविधान दुरूस्ती नुसार महिलांना पंचायत आणि नगर पालिका व महापालिकांमध्ये ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करून त्यांची राजकीय सत्तेत भागीदारी निश्चित करण्यात आली.

लोकशाही व्यवस्थेतील सर्वात निम्न स्तरावरील असणारी संस्था म्हणजे पंचायत ही होय. स्थानिक स्वशासनात या पंचायतीची भूमिका फार महत्वपूर्ण असते. प्राचीन काळापासून भारतात स्थानिक स्वशासनाची परंपरा राहिलेली आहे. स्वातंत्र्य मिळण्याच्या आधिपासूनच महात्मा गांधींनी पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून मागासलेल्या घटकांच्या हाती सत्ता सोपविण्याची कल्पना केली होती. १९५५ मध्ये पंचायत राज व्यवस्थेची सुरूवात करण्यात आली. परंतु ती आपल्या कार्यात आणि उद्देशांची पूर्तता करण्यास अपयशी ठरली. सत्ता मागास घटकांच्या हाती येण्याऐवजी गावातील उच्च आणि विशेष वर्गांच्या हाती गेली. नंतर सत्तेचे विकेंद्रीकरण करून खऱ्या अर्थाने मागास घटकांना भागीदारी देण्याचा प्रयत्न करण्यात आला. ७३ व्या आणि ७४ व्या संविधान दुरूस्तीनुसार महिलांसाठी पंचायत आणि नगर निगम मध्ये एक तृतियांश जागा राखिव ठेवून राजकीय सत्तेत भागीदारी सुनिश्चित करण्यात आली. भारतातील स्वातंत्र्यांपूर्वी महिला उपेक्षा, भेदभाव आणि शोषणाची शिकार झालेली होती. पुरूष वर्गाने आपले वर्चस्व कायम टिकवून ठेवण्यासाठी महिलांना निर्णय निर्धारण प्रक्रियेपासून वंचित ठेवून त्यांचे कार्यक्षेत्र चूल आणि मूल एवढ्यपुरते मर्यादित करून टाकले. स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने महिलांची स्थिती सुधारण्यासाठी अनेक योजना लागू केल्या. राजकीय क्षेत्रात महिलांचे योगदान सुनिश्चित करण्यासाठी भारत सरकारकडून देशाच्या पंचायत राज व्यवस्थेत त्यांच्यासाठी आरक्षणाच्या व्यवस्थेची तरतुद करण्यात आली.

भारतीय संस्कृतीमध्ये महिलांना समाजात सर्वात उंच दर्जा देण्यात आला होता. परंतु विभिन्न कारणांनी त्यांची भारतीय समाजात सामाजिक व कौटुंबिक स्थिती निरंतर कमजोर बनत गेली व त्यांच्यावर पुरूषसत्ताक समाजाने अनेक बंधने लादून अन्याय व अत्याचार सहन करण्यास भाग पाडले.

वास्तविकत: महिला पुरूषांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाहीत. मागील काही वर्षांमध्ये महिलांच्या अधिकारांचे जेवढे उल्लंघन झाले तेवढे यापूर्वी कधीही झाले नसेल. समाज व राज्याच्या विभिन्न गतिविधींमध्ये त्या मोठया प्रमाणात सहभागी झाल्या परंतु त्यांच्या सोबत अयोग्य व्यवहार, घरघुती हिंसा, सार्वजनिक ठिकाणे, सरकारी कार्यालये आणि इतर ठिकाणी होणाऱ्या हिंसेत व शोषणात सतत वाढ झाल्याचे दिसून येते. यात शारिरीक, मानसिक व यौण शोषण सुद्धा समाविष्ट आहे.

भारतीय संविधानाने महिलांना समाजाचा एक महत्वपूर्ण घटक माणून त्यांना नागरिकत्व, प्रौढ मताधिकार आणि मूलभूत अधिकारांच्या आधारावर पुरूषांच्या बरोबरीचा दर्जा व समान अधिकार प्रदान करण्यात आले. परंतु वास्तवतेत सत्ता महिलांपासून कोसो दूरच होती. विशेषकरून ग्रामीण व अनुसूचित जाती व जनजाती समाजातील महिलांपासून दूरच होती. संविधानाच्या ३९ व्या कलमाच्या आधारावर करण्यात आलेल्या व्यवस्थेनुसार राज्य सर्व स्त्री पुरूषांना समानतेने जीवन जगण्यासाठी पर्याप्त साधन प्राप्त करण्याचा अधिकार देईल. तसेच भारत सरकारने २००१ या वर्षाला राष्ट्रीय महिला सशक्तीकरण वर्ष म्हणून साजरे करण्याचा निर्णय घेतला.

आता संपूर्ण जगात महिलांना अधिकारसंपन्न बनविण्याच्या हेतूने त्यांची स्थिती मजबूत करणाऱ्या संघटना व सत्ता संचालन करणाऱ्या लोकतांत्रिक संस्थांमध्ये त्यांना आरक्षण प्रदान करण्यावर जोर देण्यात येवू लागला. भारतात या प्रक्रियेची

सुरवात म्हणून १९९३ मध्ये ७३ व्या संविधान दुरूस्तीनुसार देशातील सर्व पंचायत राज संस्थांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के जागा राखिव ठेवण्याची तरतुद करण्यात आली. ग्रामीण क्षेत्रातील आणि विभिन्न समुहाच्या महिलांना शक्तीसंपन्न बनविण्याच्या दृष्टीने उचललेले हे एक क्रांतीकारी पाऊल म्हणता येईल. या लोकतांत्रिक संस्थांशी जुडलेल्या महिला ज्या प्रमाणात जागृत होत जातील त्या प्रमाणात त्यांच्या अधिकाराचे हनन कमी होईल.

भारतात खऱ्या अर्थाने ७३ व्या घटना दुरूस्तीने पंचायत राज संस्थांमध्ये महिलांसाठी देण्यात आलेले एक तृतियांश आरक्षण महिला सशक्तीकरणाच्या दिशेने उचललेले महत्वपूर्ण पाऊल ठरले. सत्तेत भागीदारी मिळाल्यामुळे त्यांच्यामधील केवळ आत्मविश्वासच वाढला नाही तर त्या राष्ट्रविकासामध्ये सक्रिय आणि प्रभावी भूमिका बजावतांना दिसत आहे. पंचायत राज संस्थांमध्ये वाढत्या सहभागाचा विचार पुढील तक्त्याच्या आधारे स्पष्ट करता येतो.

**भारतातील पंचायत राज संस्थांमध्ये आरक्षणानंतर महिला नेतृत्वाचे प्रमाणः—**

| क्र. | पंचायत राज (स्था.स्व.सं.) | ग्राम पंचायत | पंचायत समिती | जिल्हा परिषद | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|
| १ | पंचायत राज संस्थांची संख्या | २२५००० | ५१०० | ४७५ | २३०५७५ |
| २ | एकूण सदस्य संख्या | २२५०००० | ५१००० | ४७५० | २३०५७५० |
| ३ | एकूण महिला सदस्य संख्या | ७५०००० | १७००० | १५८३ | ७६८५८३ |
| ४ | एकूण प्रमुखांची (सरपंच, सभापती, अध्यक्ष) संख्या | २२५००० | ५०००० | ४७५ | २३०४७५ |
| ५ | एकूण महिला प्रमुखांची (सरपंच, सभापती, अध्यक्ष) संख्या | ७५००० | १७०० | १५८ | ७६८५८ |

वरील सारणी लक्षात घेतल्यास असे निदर्शनास येते की ७३ व्या घटना दुरूस्तीनंतर पंचायत राज संस्थांमध्ये करण्यात आलेल्या आरक्षणाच्या तरतुदींमुळे महिला वर्गाच्या नेतृत्वात वाढ झालेली आहे. एकूण सदस्यांच्या व प्रमुखांच्या संख्यांपैकी एक तृतीयांश सदस्य प्रमुख हे महिला असल्याचे दिसून येते. आरक्षण व्यवस्थेमुळे पंचायत राज संस्थांमध्ये महिलांना जास्तीत जास्त प्रमाणात सहभागी होण्याची व नेतृत्व करण्याची संधी मिळाली आहे. त्यामुळे भारताच्या राजकारणात ग्रामीण महिला नेतृत्वाचा उदय झाला आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

महिलांना स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मिळालेल्या आरक्षणामुळे त्यांना राजकीय व्यवस्थेत सहभागी होण्याची संधी मिळाली. त्यामुळे स्थानिक राजकारणावर झालेले परिणाम पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. पंचायत राज संस्थांमध्ये मिळालेल्या आरक्षणामुळे ग्रामीण भागातील जवळपास १० लाख महिला पंचायत राज संस्थांच्या माध्यमातून देशाचे नेतृत्व करण्यास तयार होत आहेत. भावी काळात यात वृद्धी होवून ते पुरूषांच्या बरोबरीने राहू शकेल.

२. पंचायत राज संस्थांमध्ये महिलांना जे आरक्षण मिळाले त्यामुळे उच्च जातीतील व संपन्न महिलांच्या बरोबर अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती व इतर मागासवर्गीय ग्रामीण महिलांना सुद्धा नेतृत्व करण्याची निश्चितपणे संधी मिळाली आहे.

३. भारतात करण्यात आलेल्या ७३ व्या घटना दुरूस्ती नंतर पुढील काळात देशातील महिला ग्रामिण सामाजिक, आर्थिक व इतर विकासात महत्वपूर्ण भूमिका पार पाडून आपल्या नेतृत्वाचा प्रभाव निर्माण करू लागल्या आहेत.

४. महिलांना मिळालेल्या आरक्षणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांचा राजकीय सहभाग वाढत आहे. सभा, मेळावे, परिषदा, विभिन्न कार्यक्रम इत्यादीच्या माध्यमातून आपल्या नेतृत्वाची छाप जनमानसावर पाडत आहे. त्यामुळे महिलांच्या सक्षमीकरणाची वाटचाल सुरू झाली आहे असेच म्हणावे लागते.

५. पंचायत राज व्यवस्थेत अनेक महिला नेते निर्णय घेण्यात महत्वपूर्ण भूमिका पार पाडत असल्याचे दिसून येते. पंचायत राज संस्थेत एक तृतियांश महिलांचे संघटन विशिष्ट निर्णय घेण्यासाठी महत्वाचे मानले जाते. महत्वाच्या निर्णयावर महिला सरपंच विरोधकांनाही आपल्या सोबत घेवून आपली बाजू मजबूत करीत आहेत.

६. महिलांना मिळालेल्या आरक्षणामुळे महिला सदस्य तसेच सरपंचांमध्ये आत्मविश्वास, राजकीय चेतना तसेच इच्छाशक्ती या बरोबरच आपल्या हक्काच्या प्रती जागृती निर्माण झाल्याने पंचायत राज संस्थांमध्ये त्यांच्या नेतृत्वाची स्थिती मजबूत झाली आहे.

७. महिला आरक्षण धोरणामुळे पारंपारिक ग्रामीण समाजात बदल घडून येत असून पुरूषांचाही महिलांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलत चालला आहे. पुरूष मंडळी आपल्या घरातील महिलांना स्थानिक राजकारणात सहभागी होण्यासाठी प्रेरीत करीत आहेत. तसेच निवडून आलेल्या महिला सदस्यांच्या किंवा पदाधिकाऱ्यांच्या निर्णयाला पाठींबा देत आहेत. विकास कार्यात महिलांना मदत करून त्यांचे नेतृत्व मान्य करण्यास तयार झाले आहेत. या सर्व बाबींमुळे भारतात नव्या सामाजिक क्रांतीचा जन्म झाला आहे.

८. महिला आरक्षणामुळे महिला साक्षरतेच्या परिस्थितीत सुधारणा होत आहे. ग्रामीण भागातील महिलांचे संघटन निर्माण होवून संसद व राज्यांच्या विधीमंडळांमध्ये महिला आरक्षण देण्याचा दबाव वाढत आहे.

अशाप्रकारे ७३ व्या घटनादुरूस्तीनुसार महिलांना मिळालेल्या आरक्षणामुळे पंचायत राज संस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात त्यांचा सहभाग वाढत आहे. गावांमध्ये महिलांची आणि लहान मुलांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी व त्यांच्या विकासासाठी वेगवेगळया कार्यक्रमांच्या माध्यमातून महिला प्रतिनिधी भरपूर प्रयत्न करीत आहेत. या बरोबरच महिला प्रतिनिधी पंचायतीचे बजेट तयार करण्यामध्ये आपल्या कौशल्याच्या व अनुभवाच्या आधारावर महत्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. याशिवाय गावाच्या विकासाशी संबंधित योजनांचे संचालन करण्यामध्ये महिलांची भागीदारी वाढल्याने गावातील विकासाचा व सामाजिक परिवर्तनाचा मार्ग एकप्रकारे मोकळा झाला. आजची ही वास्तविकता आहे की जोपर्यंत गावाचा विकास होणार नाही तोपर्यंत संपूर्ण विकासाची कल्पना सार्थक होवू शकणार नाही.

भारतीय समाजात असलेल्या धार्मिक अंधश्रद्धा, रूढी, बालविवाह प्रथा, पर्दा पद्धती, भ्रष्टाचार इत्यादी दुष्प्रथांचे निर्मुलन करण्यामध्ये महिला प्रतिनिधींचे योगदान महत्वपूर्ण राहिलेले आहे. अन्न सुरक्षा, उर्जा सुरक्षा, पर्यावरणाचे संरक्षण व नैसर्गिक संसाधनाच्या प्रबंधन करण्यामध्येही महिला प्रतिनिधी सक्रियतेने सहभागी होत आहेत. आता ही वास्तविकता स्वीकारण्यात येत आहे की महिलांमध्ये योग्यता, क्षमता व जबाबदारीची दक्षता आहे आणि अधिक संधी व समानतेची वागणूक मिळाल्यास त्या आपल्या क्षमतेचा पूर्ण उपयोग करून समाजाच्या व देशाच्या विकासात आपले महत्वपूर्ण योगदान देवू शकते.

महिलांचा भारताच्या राजकारणात सहभाग वाढत असल्याचा दिसत असला तरी आणि अनेक क्षेत्रात महत्वपूर्ण भूमिका बजावतांना दिसत असली तरी आज गुंडागर्दी, भ्रष्टाचार, महिला अत्याचार, गुन्हेगारीकरण, दहशतवाद, धार्मिक असहिष्णुता व लाचलुचपत या सारख्या कारणांमुळे महिला आपली भूमिका योग्य प्रकारे व प्रभावी पणे पार पाडू शकत नाही. विभिन्न प्रभावशाली राजकीय व्याक्ती महिलांचे कोणत्या ना कोणत्या प्रकारे शोषण करून त्यांना गैरकायदेशिर व असामाजिक कार्य करण्यास भाग पाडतात ज्यामुळे महिला सक्षमीकरणाच्या विषयावरच प्रश्नचिन्ह उपस्थित होवू शकते. याप्रमाणेच समाजात प्रचलित असलेल्या विभिन्न सामाजिक प्रथा उदा. बालविवाह, पर्दा पद्धती, हुंडा पद्धती इत्यादी महिला कार्यकर्त्यांच्या प्रभावी भूमिका पार पाडण्याच्या कामात बाधा निर्माण करतात. निरक्षरता आणि जागृततेच्या अभावामुळे सुद्धा निर्वाचित महिला वास्तवतेत आपल्या सत्तेचा व अधिकाराचा पूर्ण उपयोग करू शकत नाही.

पंचायत राज मध्ये आरक्षण व्यवस्था महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने प्रभावी भूमिका पार पाडत असली तरी अजूनही त्यात अनेक त्रुटी व कमतरता आहेत. त्या दूर करण्यासाठी व पंचायत राज व्यवस्थेद्वारे महिला सक्षमीकरणाला अधिक प्रभावी बनविण्याच्या दृष्टीने काही विशिष्ट उपाय करण्याची गरज आहे. जसे—

१. ग्रामीण भागातील महिलांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्यायला पाहिजे.

२. ग्रामीण भागातील दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमात महिलांची भागीदारी वाढविणे.

३. ग्रामीण भागातील महिलांना लघु उद्योग व कुटिर उद्योगात सहभागी करून त्यांच्या कौटुंबिक उत्पन्नात वाढ करणे.

४. महिलांमध्ये साक्षरतेचा प्रसार करणे व त्यांना प्रशिक्षण देणे आवश्यक आहे ज्यामुळे त्या महिला प्रतिनिधी आपल्या कर्तव्याचे योग्य प्रकारे पालन करून आपली भूमिका प्रभावीपणे पार पाडतील.

५. महिलांनी आपली पुरूष वर्गावर असलेली निर्भरता कमी करायला पाहिजे ज्यामुळे महिलांच्या विकासासाठी अधिकाधिक कार्य केले जावू शकेल. या उद्देशाच्या पूर्ततेसाठी गावांमध्ये प्रशिक्षण केंद्र व प्रौढ शिक्षण केद्रांची व्यवस्था करायला पाहिजे.

६. आपल्या समाजात लिंगाच्या आधारावर करण्यात येणारा भेदभाव नष्ट करून लैंगिक समानतेवर आधारित समाजव्यवस्था निर्माण करण्यावर अधिक भर देणे आवश्यक आहे.

७. समाजात जनजागृती व शिक्षणच्या प्रचार व प्रसारातूनच मुलगा—मुलगी यांच्यातील भेद समाप्त केला जावू शकतो आणि कन्याभृण हत्ये सारख्या जघन्य गुन्हेगारी प्रवृत्तींवर नियंत्रण ठेवता येवू शकते.

८. महिलांसाठी शिक्षण, स्वास्थ्य व पोषक आहार यासारख्या प्राथमिक सोयी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

९. देशाच्या राजकीय क्षेत्रातील दोषपूर्ण तत्वांना दूर करून असे वातावरण निर्माण करायला पाहिजे की ज्यामध्ये महिला स्वतंत्रपणे व निर्भिडपणे सक्रियतेने आपली राजकीय भूमिका पार पाडू शकतील. राजकीय दृष्टया सशक्त झाल्यास महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवर सकारात्मक प्रभाव पडेल ज्यामुळे त्या समाजात आपली ओळख व प्रतिष्ठा कायम करू शकेल.

१०. महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने सर्व स्तरावर नवी चेतना निर्माण करण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी स्वयंसेवी संघटना, बुद्धीजीवी वर्ग, पत्रकार, मिडिया कर्मचारी आणि सरकार या सर्वांना एकत्रितपणे मिळून व सामुहिकपणे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

**निष्कर्ष—**

वरील विश्लेषणावरून हे स्पष्ट होते की पंचायत राज व आरक्षण व्यवस्थेद्वारे महिला सशक्तीकरणाच्या दिशेने खऱ्या अर्थाने आपण तेव्हाच अग्रेसर होवू शकू जेव्हा आपण यातील दोष व कमतरता दूर करून तीला एक मजबूत व्यवस्थेच्या रूपात लागू करू. महिलांना त्यांच्या अधिकार व कर्तव्यांची पूर्ण जाणीव करून देणे आवश्यक आहे ज्यामुळे त्या या संधीचा पूरेपूर लाभ घेवू शकतील. ग्राम पचायतीमंध्ये निर्वाचित महिलांसाठी स्थानिय प्रशिक्षण शिबीर आयोजित करून त्या विकासाच्या विभिन्न योजनांची माहिती देणे आवश्यक आहे. तसेच त्यांना त्यांच्या अधिकार व कर्तव्यांची माहिती द्यायला पाहिजे जेनेकरून त्या पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून चालू शकेल आणि राष्ट्रीय विकासाच्या मुख्य प्रवाहात येवू शकेल.

**संदर्भग्रंथ सुची**


- नारी सशक्तीकरण—आशा कौशिक
- पंचायत राज और महिला विकास—राठोड मधू—पॉईंट प्रकाशन, जयपुर
- महाराष्ट्रातील पंचायत राज—पाटील व्ही.व्ही.— के. सागर प्रकाशन
- पंचायत राज आणि सामुहिक विकास—देवगावकर श.गो.—साईनाथ प्रकाशन नागपूर
- महिलांचे राजकीय सक्षमीकरण—पवार दिपक— साईनाथ प्रकाशन नागपूर
- आजची आपली लोकशाही—दुभाशी पदमाकर—श्रीविद्या प्रकाशन, पुणे
- भारतीय समाज—समस्या आणि प्रश्न—तोश्नीवाल—विश्व पब्लीशर अँड डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर.